# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/02/2023 (गुरूवार) सकाळ

---

### घरफोडी

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील रामनगर कोंढाळी येथे दिनांक ३१/०१/२०२३ चे ०९.०० वा. ते दिनांक ३१/०१/२०२३ चे १७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश रामसेवक देशमुख, वय ६० वर्ष, रा. रामनगर कोंढाळी ता. काटोल जि. नागपुर याची पत्नी बाहेरगावी गेली असता व फिर्यादी हा रोजंदारीचे कामाने बाहेर गेला असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने तो राहत असलेल्या किरायाचे घराचे दाराला लागलेले कुलुप तोडुन घरात प्रवेश करून आलमारीतील लोंखडी पेटी मध्ये ठेवलेल्या कप्प्यात १) सोन्याचे १५ मणी व १ पेंडल एकुण १५ ग्रॅम किंमती अंदाजे ३०,०००/– रु. २) सोन्याची अंगठी ०५ ग्रॅम किंमती अंदाजे १०,०००/– रु. ३) २ जोडी तोरडया ४० ग्रॅम व जोडवे ०२ जोडी १० ग्रॅम किंमती अंदाजे २५००/– रु. असा एकुण ४२,५००/– रूपयाचा मुद्देमाल सोने व चांदीचे दागिने कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे तसेच फिर्यादीचे घरासमोर राहणारे श्री जयकिसन गिरधारीलाल चांडक यांचे मालकीची त्याच्या घरासमोर ठेवलेली दुचाकी बजाज कंपनीची सी. टी. १०० लालकाळया रंगाची रजि. क्र. एम. एच.–४०/ए. व्ही–३७७८ जुनी वापरती किंमती अंदाजे १००००/– रु. ही सुध्दा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे. असा एकुण ५२,५००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८०,३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. २०९७ गजानन तितरे पोस्टे कोंढाळी मो. नं. ८९९९९०९४२२ हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत डम्पींग यार्ड खदान नं. ४ पिपरी रोड येथे दिनांक ०१/०२/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– रविकांत रामदास कन्डे, वय ४२ वर्ष, रा. चानकापुर कॉलनी क्वा. २६१ खापरखेडा हे सकाळी ०९.०० वा. दरम्यान श्री. संतोष यादव रा. खदान नं. ३ दुर्गा मंदीर जवळ यांचे सोबत पेट्रोलिंग करीत असताना ४ नं. खदान कडुन पिपरी गावाकडे डम्पींग यार्ड जवळ आरोपी नामे– १) शिशुपाल भिमराव टेटुले, वय ४२ वर्ष, रा. अशोक नगर कन्हान २) इंदर रामजी सोनेकर, वय २२ वर्ष रा. कांद्री कन्हान यांनी आपले हिरो स्पेंल्डर मोसा क्र. एम. एच.–४०/बीयु–२५४० किंमती अंदाजे १७०००/– रू. व ०२ बोरी दगडी कोळसा १४० किलो अंदाजे ८४०/– रु. किंमती अंदाजे असा एकुण १७८४०/– रुपयाचा मुद्देमाल हिरो होन्डा शाईन एम. एच. –४०/ईडब्ल्यु–९४५२ किंमती अंदाजे २००००/–रु. व ०२ बोरी दगडी कोळसा १६० किलो अंदाजे ९६०/–रु किंमती अंदाजे असा एकुण २०९६०/–रु. घेऊन जातांनी मिळुन आल्याने दोन्ही इसमांना हटकले असता त्यांनी कबुल केले की, कामठी ओ.सी.एम. चे डम्पीग यार्ड मधुन कोळसा चोरुन विकण्यास घेऊन जात असल्याचे सागितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गुरूप्रकाश मेश्राम ब.नं ३८१ मो. नं. हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर